# ग्रामीण रस्ते सद्यस्थिती अहवाल
## ग्रा. पं. इसवली
## ता. लांजा, जि. रत्नागिरी.



**द्वारा**

**उन्नत महाराष्ट्र अभियान कक्ष - आयआयटी मुंबई**

**सर्वेक्षण व अहवाल लेखन**


अक्षय चव्हाण
तनया पंगेरकर

# अनुक्रमणिका


**१. प्रस्तावना........ 3**
**२. उद्दिष्टे........ 3**
**३. कार्यपद्धती........ 3**
**४. लांजा तालुक्यातील रस्त्यांचे जाळे - द्वितीयक माहिती........ 4**
**५. गावाविषयी........ 5**
**६. रस्त्यांच्या जाळ्याचा नकाशा व सार्वजनिक मालमत्तांची नोंद........ 5**
**७. रस्त्यांच्या दर्जाचे वर्गीकरण........ 7**
**८. सर्वेक्षणातून मिळालेली माहिती........ 11**
**९. माहिती विश्लेषण........ 15**
नियोजित रस्ते........ 15
अनियोजित रस्ते........ 15
**१०. गावातील पूल/ साकव/ कॉजवे यांची सद्यस्थिती........ 17**
**११. इ- ग्रामस्वराज संकेतस्थळावरील उपलब्ध माहिती........ 20**
**११. सारांश........ 21**
**१२. शिफारशी........ 22**
**संलग्नक........ 23**
**संदर्भ........ 25**
**आभार........ 25**

# १. प्रस्तावना

उन्नत महाराष्ट्र अभियान प्रकल्पांतर्गत जिल्हा परिषद - रत्नागिरी येथे 'भौगोलिक माहिती अधिकारी' (Geographic Information Officer - GIO) हे पद दि. १५ जून २०२३ पासून निर्माण केले गेले आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील रस्त्यांचे जाळे, पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत, शाळा, सार्वजनिक वाहतूक, इ. क्षेत्रांतील माहितीचे भौगोलिक माहिती प्रणालीद्वारे एकत्रीकरण आणि नकाशांच्या रुपात सादरीकरण करणे हे या पदाचे मुख्य कार्य आहे. याचा उपयोग संबंधित प्रशासनाला विकासकामांच्या बाबतीत योग्य निर्णय घेण्यासाठी होईल.

सदर प्रकल्पांतर्गत प्रायोगिक तत्त्वावर लांजा तालुक्यातील रस्त्यांच्या जाळ्यांचे एकत्रित माहिती संकलन केले जात आहे. भौगोलिक माहिती प्रणालीचा वापर करून रस्त्यांचे विविध प्रकार, संबंधित योजना, आत्तापर्यंत झालेला खर्च, रस्ते गुणवत्तेची सद्यस्थिती, इ. चा एकत्रित माहितीसंग्रह (Integrated Database) नकाशांच्या रूपात प्रदर्शित केला जात आहे, ज्याचा उपयोग शासनाला रस्ते विकास कामांचा प्राधान्यक्रम ठरविण्यासाठी होईल. विविध कार्यालयांमध्ये उपलब्ध असलेल्या माहितीचे संकलन, वर्गीकरण आणि विश्लेषण करणे व प्रत्यक्ष गावांमध्ये फिरून रस्त्यांचे जाळे आणि गुणवत्तेचे सर्वेक्षण करणे अशा दोन टप्प्यांमध्ये या प्रकल्पाचे काम केले जात आहे.

# २. उद्दिष्टे

१. रस्त्यांचे जाळे, गुणवत्ता, खर्च, संबंधित योजना इ. चे एकत्रित स्वरूपात माहिती संकलन करणे.
२. नकाशांच्या रूपात माहितीचे सादरीकरण करणे.
३. रस्ते विकास कार्यक्रमाच्या प्राधान्यक्रमासाठी शासनाला उपयुत शिफारशी करणे.

# ३. कार्यपद्धती

**अ) द्वितीयक माहिती संकलन**

१. जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्राम पंचायत, प्रधान मंत्री ग्राम सडक योजना, सार्वजनिक बांधकाम विभाग, इ. कार्यालयांमधून तालुक्यातील रस्त्यांशी संबंधित सर्व द्वितीयक माहिती प्राप्त करणे.
२. उपलब्ध माहितीचे वर्गीकरण व संगणक प्रणालीमध्ये मांडणी करणे.
३. तालुका पातळीवरील माहितीचे विश्लेषण व त्यावर आधारित नकाशानिर्मिती करणे.

**ब) क्षेत्रभेट व सर्वेक्षण**

१. गावाची निवड करून ग्राम संबंधित पंचायतीतून गावातल्या रस्त्यांशी संबंधित आवश्यक माहिती मिळवणे.
२. गावातील मुख्य रस्ता व प्रत्येक वाडीपर्यंत जाणाऱ्या चारचाकी वाहन रस्त्यांचे प्रत्यक्ष फिरून सर्वेक्षण करणे. (प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात गावातील अंतर्गत पाखाड्या व पायवाटा नोंदवलेल्या नाहीत)
३. प्रत्येक रस्त्यावर दर ५०० मीटर अंतरावर रस्त्याची रुंदी, डांबरी भागाची रुंदी, गुणवत्ता यांची नोंद घेणे.
४. गावातील शाळा, दवाखाने, शासकीय कार्यालये, दुकाने, स्मशानभूमी, इ. सार्वजनिक ठिकाणांचे व मालमत्तांचे जिओटॅगिंग करणे. प्रत्येक रस्त्यावर अवलंबित लोकसंख्या किती आहे त्याची नोंद घेणे.

**क) अहवाल निर्मिती**

१. जीआयएस प्रणालीचा वापर करून गावातील रस्त्यांचे जाळे, रस्त्यांचा दर्जा व सार्वजनिक ठिकाणे व मालमत्ता दर्शविणारा गावाचा नकाशा तयार करणे
२. अहवाल लेखन
३. ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, शाळा-महाविद्यालये, इ. ठिकाणी अहवालाचे सादरीकरण.


# ४. लांजा तालुक्यातील रस्त्यांचे जाळे - द्वितीयक माहिती

२०११ च्या जनगणनेनुसार लांजा तालुक्याची एकूण लोकसंख्या १,०६,९८६ आहे. तालुक्यामध्ये एकूण १२२ गावे आहेत ती ६० ग्रामपंचायतींमध्ये विभागली आहेत, तसेच तालुक्यामध्ये एक नगरपरिषद आहे. लांजा तालुक्यातील रस्त्याच्या जाळ्याची एकूण लांबी जवळपास १०१३ किलोमीटर असून त्यामध्ये एक राष्ट्रीय महामार्ग, पाच राज्य महामार्ग, चार प्रमुख जिल्हा मार्ग, सोळा इतर जिल्हा मार्ग व ३०५ ग्रामीण मार्ग यांचा समावेश आहे.

रस्त्यांची वर्गीकरणानुसार लांबी खालीलप्रमाणे (छायाचित्र १):

- राष्ट्रीय महामार्ग: २६.४१ किलोमीटर
- राज्य महामार्ग: ९८.४२ किलोमिटर
- प्रमुख जिल्हा मार्ग: ७५ किलोमीटर
- इतर जिल्हा मार्ग: १७३.४१ किलोमीटर
- ग्रामीण मार्ग: ६३९.५२ किलोमीटर

जिल्हा परिषदेकडून मिळालेल्या माहितीनुसार, अलिकडच्या ५ वर्षांत सुमारे ३७३ किलोमीटर रस्त्यांची दुरुस्ती किंवा बांधकामे झाली आहेत. प्रतिवर्षी सरासरी ७५ किलोमीटर रस्त्यांची कामे केली गेली आहेत. हे प्रमाण लांजा तालुक्यातील एकूण रस्त्यांच्या लांबीच्या १० टक्क्यांपेक्षा कमी आहे. रस्ता दुरुस्ती आणि बांधकामासाठी मागील ५ वर्षातील एकूण खर्च हा ७३.७२ कोटी रुपये, म्हणजेच, सरासरी २० लाख रुपये प्रति किलोमीटर एवढा खर्च झाला आहे. लांजा तालुक्यातील १२२ गावांपैकी २२ गावांमध्ये मागील पाच वर्षांत रस्ते दुरुस्ती किंवा बांधकाम झालेले नाही. पुढील नकाशा लांजा तालुक्यातील रस्त्यांची वर्गवारी दर्शवितो.





| रस्त्यांची वर्गवारी | एकूण रस्ते | लांजा तालुक्यातील रस्त्यांची लांबी (कि.) |
|---|---|---|
| राष्ट्रीय महामार्ग | १ | २६.४१ |
| राज्य महामार्ग | ५ | ९८.४२ |
| प्रमुख जिल्हा मार्ग | ४ | ७५.१ |
| इतर जिल्हा मार्ग | १६ | १७३.४१ |
| ग्रामीण मार्ग | ३०५ | ६३९.५२ |

**छायाचित्र १. लांजा तालुक्यातील रस्त्यांचा वर्गवारी नकाशा**

## ५. गावाविषयी


लांजा तालुक्यातील इसवली या ग्रामपंचायत हद्दीत येणाऱ्या रस्त्यांच्या सर्वेक्षणाचा हा अहवाल आहे. ग्रामपंचायत इसवली अंतर्गत इसवली आणि पनोरे ही दोन महसुली गावे येतात. इसवली गावाचे क्षेत्रफळ १०८५.५७ हेक्टर असून गावाची लोकसंख्या १०२१ आहे. पनोरे गावाचे क्षेत्रफळ ४९१.४५ हेक्टर असून लोकसंख्या ४९७ आहे. दोनही गावे लांजा या तालुक्याच्या व रत्नागिरी या जिल्ह्याच्या ठिकाणापासून ६७ किमी अंतरावर वसलेली आहेत. वाघ्रट, खानवली, भडे, बेनी बुद्रुक, साटवली, रुण, बापेरे, रावरी, जावडे ही इसवली व पनोरे या गावाच्या शेजारील गावे आहेत. इसवली या महसूल गावात सुतारवाडी, रेवटेवाडी, कोंडवाडी, खांबेरेवाडी, गुरववाडी, बौद्धवाडी आणि पाथरवाडी अशा एकूण ७ वाड्या आहेत. पनोरे या महसुली गावात कवचेवाडी, मोर्येवाडी, नरसलेवाडी, बौद्धवाडी, सुर्वेवाडी आणि जुलूमवाडी अशा ६ वाड्या आहेत.




छायाचित्र २. इसवली व पनोरे गावांचा स्थाननिश्चिती नकाशा

## ६. रस्त्यांच्या जाळ्याचा नकाशा व सार्वजनिक मालमत्तांची नोंद

इसवली ग्रामपंचायतीच्या हद्दीत येणाऱ्या इसवली आणि पनोरे या दोनही गावांमधील मुख्य रस्ते व प्रत्येक वाडीपर्यंत जोडणारे रस्ते वाहनाच्या सहाय्याने फिरून जीपीएस ॲप्लिकेशनच्या सहाय्याने त्यांचे ट्रॅक घेण्यात आले. उपग्रह छायाचित्र, शासकीय कार्यालयांमधून मिळालेली माहिती व प्रत्यक्ष सर्व्हे यांतून मिळालेली माहिती पडताळून गावाच्या रस्त्यांचा जाळ्याचा नकाशा तयार केला. रस्त्यांची पाहणी करताना रस्त्याच्या आजूबाजूला असणारी सार्वजनिक ठिकाणे व मालमत्ता (कार्यालये, दवाखाने, शाळा, बस स्टॉप, दुकाने, सांस्कृतिक वास्तू, मंदिरे, स्मशानभूमी, इ.) यांची लोकेशनसहित छायाचित्रे घेतली. जीआयएस प्रणालीचा वापर करून गावातील रस्त्यांचे जाळे व सार्वजनिक ठिकाणे व मालमत्ता दर्शविणारा नकाशा (छायाचित्र ३) पुढीलप्रमाणे तयार केला आहे.




**छायाचित्र ३. इसवली ग्रामपंचायत हद्दीतील रस्त्यांचे जाळे, सार्वजनिक ठिकाणे व मालमत्ता दर्शविणारा नकाशा**

## ७. रस्त्यांच्या दर्जाचे वर्गीकरण

इसवली ग्रामपंचायत हद्दीत येणाऱ्या रस्त्यांचे वाहनाने प्रत्यक्ष फिरून सर्वेक्षण करण्यात आले. रस्त्याच्या पृष्ठभागाच्या स्थितीनुसार रस्त्याच्या दर्जाचे ६ श्रेणींमध्ये पुढीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात आले. पुढील तक्ता आपल्याला रस्त्याचा दर्जा, त्या दर्जाचे निकष आणि त्या दर्जाच्या रस्त्याचा नकाशामध्ये दिलेला रंग (पहा: छायाचित्र ५. इसवली ग्रापंचायत हद्दीतील रस्त्यांच्या जाळ्याचा दर्जानिहाय नकाशा - पान क्र. ९) दर्शवतो. हे वर्गीकरण प्रत्यक्ष वाहनाने रस्त्यावर फिरताना रस्ता कसा दिसतो व गाडी किती कमाल वेगाने फिरू शकते या आधारावर केले गेले आहे.

**तक्ता क्र. १ रस्त्यांच्या दर्जाचे वर्गीकरण**

| दर्जा | दर्जा श्रेणी | निकष | नकाशातील रंग |
|---|---|---|---|
| अ | चांगला | १. गुळगुळीत पृष्ठभाग.<br>२. पृष्ठभागाची सुयोग्य लेव्हल.<br>३. एकही छोटा वा मोठा खड्डा नाही.<br>४. वाहनाचा कमाल वेग - ५० किमी प्रति तास. | हिरवा |
| ब | मध्यम | १. खड्डे नाहीत, परंतु लेव्हलिंग नीट नाही.<br>२. पृष्ठभाग एकदम गुळगुळीत नाही.<br>३. वाहनाचा कमाल वेग ३५ ते ५० किमी प्रति तास. | जांभळा |
| क | खराब | १. खडबडीत पृष्ठभाग.<br>२. मध्येमध्ये छोटे खड्डे.<br>३. वाहनाचा कमाल वेग २० ते ३५ किमी प्रति तास. | पिवळा |
| ड | अति खराब | १. मोठे खड्डे.<br>२. डांबरीकरण बरेचसे गेलेले.<br>३. वाहनाचा कमाल वेग २० किमी प्रति तास. | गुलाबी |
| इ | कच्चा रस्ता | १. डांबरीकरण अद्याप केलेले नाही.<br>२. लाल मातीचा वाहनयोग्य कच्चा रस्ता | केशरी |
| फ | पायवाट | १. वाहनयोग्य रस्ता नाही.<br>२. पायी चालत जाण्यायोग्य वाट | लाल |


वरीलप्रकारे केलेले रस्त्यांच्या दर्जाचे वर्गीकरण पुढील छायाचित्रात दर्शविले आहे. (पहा. छायाचित्र क्र. ४ - पान क्र. ८) या छायाचित्रावरून रस्त्यांच्या दर्जाचे वर्गीकरण अधिक स्पष्ट होते.




छायाचित्र ४. रस्त्यांच्या दर्जाचे वर्गीकरण (प्रातिनिधिक छायाचित्र)

वरीलप्रमाणे वर्गीकरणाचे निकष ठरवून इसवली ग्रामपंचायत हद्दीत येणाऱ्या सर्व रस्त्यांचे सर्वेक्षण करून त्यांच्या दर्जाची नोंद केली. रस्त्यांचे जीपीएस ट्रॅक घेऊन ते जीआयएस च्या सहाय्याने नकाशावर दाखवले व वेगवेगळ्या दर्जाच्या रस्त्यांना वेगवेगळे रंग दिले. अशाप्रकारे इसवली ग्रामपंचायत हद्दीतील रस्त्यांच्या जाळ्याचा दर्जानिहाय नकाशा पुढीलप्रमाणे तयार केला. हा नकाशा इसवली ग्रामपंचायतीची हद्द, ग्रामपंचायत हद्दीतील रस्त्यांचे जाळे, वेगवेगळ्या रंगांनी दर्शविलेले वेगवेगळ्या दर्जाचे रस्ते (पहा - तक्ता क्र.१ - रस्त्यांच्या दर्जाचे वर्गीकरण) दर्शवितो.

खालील नकाशात काळ्या तुटक रेषेने दर्शविलेला रस्ता हा जागेवर नसल्याचे दिसून येते, तर हिरव्या रंगाने दर्शविलेले रस्ते 'चांगल्या दर्जाचे', जांभळ्या रंगाने दर्शविलेले रस्ते 'मध्यम दर्जाचे', पिवळ्या रंगाने दर्शविलेले रस्ते 'खराब दर्जाच', गुलाबी रंगाने दर्शविलेले रस्ते 'अतिखराब दर्जाचे', केशरी रंगाने दर्शविलेले रस्ते 'कच्चे रस्ते' तर लाल रंगाने दर्शवलेले रस्ते या 'पायवाटा' आहेत. त्याचप्रमाणे नियोजित रस्ते हे सरळ रेषेने दाखविले असून अनियोजित रस्ते हे तुटक रेषेने दर्शविले आहेत.




छायाचित्र ५. इसवली ग्रापंचायत हद्दीतील रस्त्यांच्या जाळ्याचा दर्जानिहाय नकाशा

# ८. सर्वेक्षणातून मिळालेली माहिती

सर्वेक्षणातून नोंद केलेल्या रस्ता क्रमांक, एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणापर्यंतचा मार्ग, त्यावर असणारी सार्वजनिक ठिकाणे व मालमत्ता, त्या मार्गावरील अवलंबित लोकसंख्या, दर्जानुसार रस्त्याचे भाग, प्रत्येक भागाची लांबी, रुंदी, पेव्हमेंट, इ. बाबींची तक्त्याच्या स्वरुपात पुढीलप्रमाणे मांडणी केली. या तक्त्यामुळे गावाच्या रस्त्याच्या जाळ्यांचे चित्र स्पष्ट होते. कुठून कुठपर्यंतचा रस्ता किती लांबीचा आहे, त्यावर अवलंबित लोकसंख्या किती आहे, त्याचा दर्जा कसा आहे, त्या रस्त्याच्या आजूबाजूला सार्वजनिक ठिकाणे व मालमत्ता कोणत्या आहेत, त्या रस्त्याची रुंदी किती आहे या सर्व गोष्टी एका नजरेत आपल्याला कळतात.

**तक्ता क्र. २ सर्वेक्षणातून मिळालेली माहिती (नियोजित रस्ते)**

| अ. क्र. | रस्ता क्र. | एकूण रस्त्याची लांबी[1] (किमी) | रस्त्याची लांबी (गावातील) (किमी) | पासून | पर्यंत | मार्गावरील सार्वजनिक ठिकाणे व मालमत्ता | अवलंबित लोकसंख्या (अंदाजे) | रस्ता भाग क्र. | दर्जा | लांबी (किमी) | पेव्हमेंट रुंदी (मी) | रस्त्याची रुंदी (मी) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | प्र.जि.मा.६३ | २४.१५ | ९.९६ | रा.मा.१५० | जावडे गाव | १) रेशन दुकान (पनोरे)<br>२) शाळा १ ते ५<br>३) अंगणवाडी (मोर्येवाडी )<br>४) रवळनाथ मंदिर<br>५) सोमेश्वर मंदिर<br>६)नवलादेवी मंदिर | २०००+ | १ | क | २.५३ | ३.५ | ५.५ |
| | | | | | | | | २ | ब | १.५६ | ३.५ | ६ |
| | | | | | | | | ३ | ब | ०.०२ | ३.५ | ७.५ |
| | | | | | | | | ४ | ब | ०.०२ | ३.५ | ७.५ |
| | | | | | | | | ५ | ब | २.४७ | ३.५ | ५.५ |
| | | | | | | | | ६ | क | १.१७ | २ | ३ |
| | | | | | | | | ७ | इ | ०.४८ | ० | ३ |
| | | | | | | | | ८ | ड | ०.५९ | ३ | ५ |
| | | | | | | | | ९ | इ | ०.०७ | ० | ५ |

---

[1] स्रोत: सार्वजनिक बांधकाम विभाग

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | १० | ब | ०.९७ | ४ | ७ |
| २) | रा.मा.१५० | १३.७२ | ०.३८ | पावस, रत्नागिरी | साटवली गाव | - | २०००+ | १ | अ | ०.३८ | ६ | १० |
| | | | | | | | | २ | ब | ०.६७ | ५ | १३ |
| | | | | | | | | ३ | क | ९ | ३ | ७ |
| ३) | ग्रा.मा.११२ | ३.५ | ३.१२ | सुतारवाडी प्राथमिक शाळा | प्र.जि.मा.६३ | १) ग्रामपंचायत<br>२) पोस्ट ऑफिस<br>३) दवाखाना (खाजगी)<br>४) रेशन दुकान (इसवली)<br>५) शाळा १ ते ७<br>६) शाळा १ ते ५ | १५००+ | १ | ब | १.०२ | ३.५ | ५.५ |
| | | | | | | | | २ | इ | ०.१४ | ३.५ | ६ |
| | | | | | | | | ३ | क | ०.९२ | - | ३.५ |
| | | | | | | | | ४ | क | १.०२ | ३ | ५ |
| ४) | ग्रा.मा.१३६ | ४.५ | २.७२ | ग्रा.मा.११२, इसवली ग्रामपंचायत | कोंडवाडी, खांबेरेवाडी (ग्रा.मा.११२) | - | २००+ | १ | - | १.५५ | - | - |
| | | | | | | | | २ | अ | १.१८ | - | - |
| ५) | ग्रा. मा. १६४ | ७ | २.५४ | प्र.जि.मा.६३ | गुरववाडी रस्ता | १) नवलादेवी मंदिर<br>२)समाजमंदिर (गुरववाडी) | १५०+ | १ | क | ०.७१ | ३ | ५ |
| | | | | | | | | २ | इ | १.७९ | ३ | ७ |
| | | | | | | | | ३ | इ | ०.०५ | - | - |
| ६) | ग्रा. मा .१८६ | २.५ | १.७७ | ग्रा.मा.१३६ | प्र.जि.मा.६३ (नवलादेवी मंदिर गुरववाडी) | १) बौद्धविहार<br>२) धर्मशाळा | २००+ | १ | ब | ०.१७ | - | - |
| | | | | | | | | २ | ब | १.८३ | - | - |
| ७) | ग्रा. मा १८७ | १.५ | ०.८८ | ग.मा.११२ व ग्रा.मा.१३६ | पाथरवाडी, खांबेरेवाडी रस्ता | १) मारुती मंदिर | ५००+ | १ | इ | ०.८३ | ३.५ | ६.५ |

|  |  |  |  |  |  |  |  |  |  |  |  |  |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८) | ग्रा.मा १८८ | ०.७ | ०.४१ | प्र.जि.मा.६३ | सुतारवाडी | १) अंगणवाडी<br>२) नवलदेवी मंदिर<br>३) शाळा १ ते ७ वी | ५००+ | १ | क | ०.४२ | ३ | ६ |
| ९) | ग्रा. मा २३१ | ०.५ | ०.१९ | प्र.जि.मा.६३ | शेताकडे जाणारा रस्ता | - | १०+ | १ | इ | ०.१९ | - | - |
| १०) | ग्रा. मा २५३ | ०.५ | ०.१५ | रा.मा.१५० | दळवीवाडी रस्ता साटवली | - | १००+ | १ | क | ०.१५ | ३.५ | ५.५ |

**तक्ता क्र. ३ सर्वेक्षणातून मिळालेली माहिती (अनियोजित रस्ते)**

| अ. क्र. | पासून | पर्यंत | मार्गावरील सार्वजनिक ठिकाणे व मालमत्ता | अवलंबित लोकसंख्या (अंदाजे) | दर्जा श्रेणी | लांबी (किमी) | पेव्हमेंट रुंदी (मी) | रस्त्याची रुंदी (मी) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | गुरववाडी | खांबेरेवाडी | - | १००+ | इ | ०.७६ | ३.५ | ३.५ |
| २) |  |  | - | ५० | इ | ०.४७ | २.५ | २.५ |
| ३) | रा.मा.१५० | जुलूमवाडी | - | ५०० | क | १.०७ | ३.५ | ३.५ |
| ४) | प्र.जि.मा.६३ | बौद्धवाडी | - | १०० | इ | ०.२३ | ३.५ | ३.५ |
| ५) | प्र.जि.मा.६३ | कवचेवाडी | १) शाळा १ ते ५ वी | २००+ | क | ०.३१ | ३ | ३ |
| ६) | प्र.जि.मा.६३ | मोर्येवाडी | १) अंगणवाडी | १००+ | इ | ०.१४ | ३ | ३ |
| ७) | प्र.जि.मा.६३ | रेवटेवाडी | १) शाळा १ ते ४ थी | १००+ | क | ०.३२ | ३.५ | ३.५ |
| ८) | प्र.जि.मा.६३ | सुर्वेवाडी | - | ५० | इ | ०.०८ | ३ | ३ |
| ९) | ग्रा.मा.११२ | सुतारवाडी | १) शाळा १ ते ७<br>२) अंगणवाडी<br>३) नवलादेवी मंदिर | ५००+ | क | ०.३१ | ३ | ३ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १०) | प्र.जि.मा.६३ | नरसलेवाडी | १) शाळा १ ते ५ वी<br>२) स्मशानभूमी<br>३) बेन नदी | २००+ | इ | ०.५३ | ३ | ३ |
| ११) | प्र.जि.मा.६३ (पनोरे रेशन दुकान) | कातळशिल्प | कातळशिल्प | ३००+ | इ | ०.३५ | ३ | ३ |
| १२) | प्र.जि.मा.६३ | कातळशिल्प | कातळशिल्प | ५०+ | फ | १.०७ | - | - |

# ९. माहिती विश्लेषण

सर्वेक्षणातून मिळालेल्या माहितीची तक्ता स्वरुपात मांडणी केल्यावर या माहितीचे विश्लेषण केले. यामध्ये नियोजित आणि अनियोजित प्रकारांमधील प्रत्येक रस्त्याची एकूण लांबी प्रत्येक दर्जा श्रेणीमध्ये असलेल्या रस्त्याच्या भागांची एकूण लांबी याचा तक्ता व आलेख पुढीलप्रमाणे तयार केला.

## नियोजित रस्ते

गावामधील रस्ते जे शासन निधीतून झाले आहेत व ज्या रस्त्यांना शासनाकडून वर्गवारी व रस्ता क्रमांक दिलेला आहे अशा रस्त्यांना 'नियोजित रस्ते' असे म्हटले आहे. इसवली गावात केलेल्या सर्वेक्षणात १ प्रमुख जिल्हा मार्ग, १ राज्य महामार्ग व ८ ग्रामीण रस्ते आढळून आले. या सर्व रस्त्यांची लांबीचे व दर्जाचे विश्लेषण खालील तक्त्यात केले आहे.

**तक्ता क्र. ४ इसवली ग्रामपंचायत हद्दीतील रस्त्यांची दर्जा स्थिती (नियोजित रस्ते)**


| रस्ता दर्जा श्रेणी | ० | अ | ब | क | ड | रस्ता अस्तित्वात नाही | एकूण लांबी (कि.मी.) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| रस्ता क्र. | | | | | | | |
| प्र.जि.मा.६३ | | | ५.०५ | ३.७१ | ०.५९ | ०.५५ | ९.९१ |
| रा.मा.१५० | | ०.३८ | ०.६७ | ३.०० | | | ४.०६ |
| ग्रा.मा.११२ | | | १.०२ | १.९४ | | ०.१३ | ३.१ |
| ग्रा.मा.१३६ | १.५४ | १.१७ | | | | | २.७२ |
| ग्रा.मा.१६४ | | | | ०.७० | | १.८३ | २.५४ |
| ग्रा.मा.१८६ | | | १.८३ | | | | १.८३ |
| ग्रा.मा.१८७ | | | | | | ०.८२ | ०.८२ |
| ग्रा.मा.१८८ | | | | ०.४१ | | | ०.४१ |
| ग्रा.मा.२३१ | | | | | | ०.१९ | ०.१९ |
| ग्रा.मा.२५३ | | | | ०.१५ | | | ०.१५ |
| एकूण | १.५४ | १.५६ | ८.५८ | ९.९३ | ०.५९ | ३.५५ | २५.७८ |

## अनियोजित रस्ते

गावातील असे रस्ते जे गावकऱ्यांच्या श्रमदानातून किंवा ग्रामप्रशासन व विविध निधीतून तयात झाले आहे परंतु त्या रस्त्यांना वर्गवारी व रस्ता क्रमांक दिलेला नाही अशा रस्त्यांना 'अनियोजित रस्ते' असे म्हटले आहे. इसवली गावातील सर्वेक्षणात १२ अनियोजित रस्ते आढळून आले. ह्या रस्त्यांमध्ये प्रामुख्याने वाड्यांपर्यंत जाणारे रस्ते आपल्याला दिसून येतात. या सर्व रस्त्यांची लांबीचे व दर्जाचे विश्लेषण खालील तक्त्यात केले आहे.

तक्ता क्र. ५ सर्वेक्षणातून मिळालेली माहिती (अनियोजित रस्ते)

| पासून | पर्यंत | क | इ | फ | एकूण लांबी (कि.मी.) |
|---|---|---|---|---|---|
| गुरववाडी | खांबेरेवाडी | | ०.७६ | | **०.७६** |
| रा.मा.१५० | जुलूमवाडी | | ०.४७ | | **०.४७** |
| प्र.जि.मा.६३ | बौद्धवाडी | | ०.२३ | | **०.२३** |
| प्र.जि.मा.६३ | कवचेवाडी | ०.३१ | | | **०.३१** |
| प्र.जि.मा.६३ | मोर्येवाडी | | ०.१४ | | **०.१४** |
| प्र.जि.मा.६३ | रेवटेवाडी | ०.३२ | | | **०.३२** |
| रा.मा.१५० | जुलूमवाडी | १.०७ | | | **१.०७** |
| प्र.जि.मा.६३ | सुर्वेवाडी | | ०.०८ | | **०.०८** |
| ग्रा.मा.११२ | सुतारवाडी | ०.३१ | | | **०.३१** |
| प्र.जि.मा.६३ | नरसलेवाडी | | ०.५३ | | **०.५३** |
| प्र.जि.मा.६३ (पनोरे रेशन दुकान) | कातळशिल्प | | ०.३५ | | **०.३५** |
| प्र.जि.मा.६३ | कातळशिल्प | | | १.०७ | **१.०७** |
| एकूण | | **२.०२** | **२.५६** | **१.०७** | **५.६५** |




आलेख क्र. १ इसवली ग्रामपंचायत हद्दीतील रस्त्यांची दर्जा स्थिती (नियोजित व अनियोजित रस्ते)

**वरील आलेखामध्ये नियोजित रस्त्यांचा दर्जा हा सरळ स्थंभाने दर्शविला असून अनियोजित रस्त्यांचा दर्जा हा तुटक रेषांची कडा असलेल्या स्तंभाने दाखविले आहेत.**

## १०. गावातील पूल/ साकव/ कॉजवे यांची सद्यस्थिती

- लांजा तालुक्यातील इसवली गावातून वाहणारी बेनी नदी हि बेनी गावातील तलावातून उगम पावत असून रत्नागिरी तालुक्यातील गावखडी गावाजवळ अरबी समुद्राला येऊन मिळते. या नदीला बारमाही पाणी असते. या नदीवरील इसवली ग्रामंचायातीच्या हद्दीतील राज्य महामार्ग ६६ वरील पूल हा साधारण ६५ मी. लांबीचा असून याची रुंदी ३.५ मी. इतकी आहे. पुलाचे बांधकाम हे काँक्रीट स्वरूपाचे असून सद्यस्थिती चांगली आहे. या पुलावरून साधारण ५०००+ लोकसंख्या ये-जा करत असते. या मार्गावरून साधारणतः साटवली व ऋण हि गावे मुख्यत्वेकरून अवलंबून आहेत.

- प्रमुख जिल्हा मार्ग ६३ वरील सोमेश्वर मंदिरामागे (कवचेवाडी व सुतारवाडी जवळील) असणाऱ्या पुलाची रुंदी ९ मी. असून रुंदी (पेव्हमेंट) ४.५ मी. इतकी आहे. गावातील मुख्य रस्त्यावर असणारा हा महत्वाचा पूल आहे. या पुलावर मुख्यत्वेकरून इसवली व पनोरे हि गावे अवलंबून असून पुलाखालून वाहणारे पाणी हे हंगामी स्वरूपाचे आहे. सध्या या पुलाच्या बांधकामाला भेगा गेलेल्या आहेत.

- इसवली गावाच्या उत्तरेकडील सीमेवरील जावडे गावात जाणारा प्रमुख जिल्हा मार्ग ६३ वरील पूल हा ४.५ मी रुंदीचा असून या पुलावरून साधारण २०००+ लोकसंख्या ये जा करते. या पुलाखालून वाहणारे पाणी बेनी तलावातील झऱ्याचे असून हे पाणी बारमाही स्वरूपाचे आहे. मुख्यत्वे करून इसवली, पनोरे व जावडे या गावांना या पुलाचा उपयोग होतो. या पुलाचे बांधकाम हे काँक्रीट स्वरूपाचे असून पुलाची सद्यस्थिती चांगली आहे. लांजा शहरातून येणाऱ्या व जाणाऱ्या एस टी बस या मार्गाने ये जा करतात.

- पनोरे ते साटवली या गावांना जोडणाऱ्या व  जुलूमवाडीत जाणारा साकव हा अत्यंत निकृष्ट दर्जाचा असून हा साकव केवळ २ लाकडी बांबूवर बांधलेला आहे. या साकवाची डागडुजी करणे अत्यंत आवश्यक आहे.

- पनोरे कवचेवाडी व इसवली सुतारवाडी यांना जोडणारा साकव हा काँक्रीट व लोखंडी असून यावरून केवळ पायी ये जा करणे शक्य आहे. सध्या याची स्थिती चांगली आहे.

- इसवली या महसूल गावातील पाथरवाडी व गुरववाडी जोड साकव हा लाकडी बांधणीचा आहे. या साकवाचा वापर हा ग्रामस्थ व शाळकरी मुले दररोज येण्या-जाण्याकरिता करतात. साकवाच्या खालील वहाळ स्वच्छ करणे व साकवाची  देखभाल करणे आवश्यक आहे.

❖ खालील तक्त्यामध्ये देवधे गावातील सर्वेक्षणामध्ये आढळलेले पूल व साकव/कॉजवे याबद्दलची माहिती दर्शवली आहे.

**तक्ता क्र. ६ सर्वेक्षणातून मिळालेली पूल/साकव/ कॉजवे याची माहिती**

| छायाचित्र क्र. | नाव | प्रकार | बांधणीचा प्रकार | लांबी (मी) | रुंदी (मी) | अवलंबित लोकसंख्या (अंदाजे) | अवलंबित गावे / वाड्या | सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | बेनी नदीवरील राज्य महामार्ग ६६ वरील पूल | पूल | काँक्रीट बांधणी | ६५ | ३.५ | ५०००+ | बेनी, साटवली, रुण | चांगली |
| २ | प्रमुख जिल्हा मार्ग ६३ वरील सोमेश्वर मंदिरामागील पूल | पूल | काँक्रीट बांधणी | | ९ | २०००+ | इसवली, पनोरे | पूलाला भेगा गेल्या आहेत. |
| ३ | गावाच्या उत्तर सीमेवरील जावडे गावात जाणारा प्रमुख जिल्हा मार्ग ६३ वरील पूल | पूल | काँक्रीट बांधणी | ४० | ४.५ | २०००+ | इसवली, जावडे | चांगली |
| ४ | पनोरे ते साटवली या गावांना जोडणाऱ्या व जुलूमवाडीत जाणारा साकव | साकव | लाकडी बांधणी | २.५ | ०.५ | ५० | इसवली, पनोरे, साटवली | साकवाची डागडुजी करणे गरजेचे आहे. |
| ५ | पनोरे कवचेवाडी व इसवली सुतारवाडी यांना जोडणारा साकव | साकव | काँक्रीट व लोखंडी बांधणी | ३ | १ | ५००+ | कवचेवाडी (पनोरे), सुतारवाडी (इसवली) | चांगली |
| ६ | पाथरवाडी व गुरववाडीला जोडणारा लाकडी साकव | साकव | लाकडी बांधणी | ३.५ | १ | ४००+ | पाथरवाडी, गुरववाडी | लाकडी साकवाची डागडुजी करणे आवश्यक आहे. |

खालील छायाचित्र क्रमांक ६ मध्ये अनुक्रमे वरील माहितीनुसार इसवली गावातील पूल/साकव/कॉजवे यांची छायाचित्र दिलेली आहेत.



**छायाचित्र ६. इसवली ग्रामपंचायत हद्दीतील रस्त्यांवर असणारे पूल/साकव/कॉजवे**


## ११. इ- ग्रामस्वराज संकेतस्थळावरील उपलब्ध माहिती

eGramSwaraj हे पंचायती राज मंत्रालयाने तयार केलेले संकेतस्थळ आहे. eGramSwaraj चे उद्दिष्ट विकेंद्रित नियोजन, प्रगती अहवाल आणि कामांवरील आधारित लेखामध्ये उत्तम पारदर्शकता आणणे आहे. पंचायतींना त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या संसाधनांचा वापर करून आर्थिक विकास आणि सामाजिक न्यायासाठी पंचायत (ग्राम) विकास आराखडा (Village Action Plan ) तयार करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

**तक्ता क्र. ७ ग्राम विकास आराखड्यानुसार सन २०१९ ते २०२३ या वर्षातील रस्ते कामांच्या खर्चाचा तपशील**

| | वर्ष | रस्ता बांधणे/दुरुस्ती | पाखाडी बांधणे/दुरुस्ती | गटार बांधणे/दुरुस्ती | एकूण (लाख) |
|---|---|---|---|---|---|
| **ग्रामपंचायत इसवली** | २०१९-२० | ९७०९५ | ३२२६०१ | ० | **४१९६९६** |
| | २०२०-२१ | ० | ० | १५७६३१ | **१५७६३१** |
| | २०२१-२२ | ३२३४६० | १८९४९३ | ० | **५१२९५३** |
| | २०२२-२३ | ० | ५०००० | २३९९५० | **२८९९५०** |
| | **एकूण (लाख)** | **४२०५५५** | **५६२०९४** | **३९७५८१** | **१३८०२३०** |

वरील तक्त्यात इसवली ग्रामपंचायतीने २०१९-२०२३ या ५ वर्षांच्या कालावधीमध्ये पंचायत विकास आराखड्यानुसार रस्ता बांधणे/दुरुस्तीसाठी, पाखाडी बांधणे/दुरुस्ती व गटार बांधणे/दुरुस्ती यासाठीच्या खर्चाचा तपशील मांडला आहे. वरील तक्त्यानुसार पंचायत विकास आराखड्यामध्ये सर्वाधिक खर्च हा पाखाडी बांधणे/दुरुस्तीवर झाला असल्याचे दिसून येते. मागील ५ वर्षांमध्ये वरील तीन कामांवर पंचायत विकास आराखड्यानुसार **१३,८०,२३०** रुपये खर्च झाले आहेत.




**आलेख क्र. २, २०१९ ते २०२३ या कालावधीत ग्राम विकास आराखड्यानुसार रस्ते कामांवर केलेला खर्च**

इसवली ग्रामपंचायत अंतर्गत गावांचे सर्वेक्षण करताना आढळून आलेल्या निरीक्षणानुसार पुढीलप्रमाणे कामांचा समावेश नवीन ग्रामविकास आराखड्यामध्ये समाविष्ट करता येऊ शकते.

- पनोरे जुलूमवाडी वस्तीपर्यंत जाणारा सुयोग्य रस्ता बनविणे.
- जुलूमवाडी वसाहती अंतर्गत असणाऱ्या साकवांची पुनर्बांधणी करणे. (१)पनोरे ते ऋण साकव (२) पनोरे ते साटवली साकव
- गुरववाडी व पाथरवाडी यांना जोडणाऱ्या पुलाची डागडुजी करणे व गटार बांधणी/दुरुस्ती करणे.
- कातळशिल्पांपर्यंत जाणाऱ्या पायवाटा साफ करणे व कातळशिल्प संरक्षित करणे.
- प्रमुख जिल्हा मार्ग ६३ (कवचेवाडी) ते कवचेवाडी स्मशानभूमी पर्यंत जाणारा रस्ता साफ (स्वच्छ) करणे.

# ११. सारांश

i. इसवली ग्रामपंचायतीत इसवली आणि पनोरे ही दोन महसुली गावे येतात. इसवली ग्रामपंचायत हद्दीचे एकूण क्षेत्रफळ हे १५७७.४५ हेक्टर असून दोनही गावांची मिळून एकूण लोकसंख्या १४२५ एवढी आहे.

ii. इसवली ग्रामपंचायत हद्दीतील नियोजित रस्त्यांची एकूण लांबी ही २२.०९ किमी आहे. त्यापैकी ग्रामीण रस्त्यांची लांबी ११.८० किमी एवढी आहे, 'प्रमुख जिल्हा मार्ग' याची लांबी ९.९१ किमी आहे, राज्य महामार्गाची लांबी ०.३८ किमी आहे.

iii. इसवली ग्रामपंचायत हद्दीतील अनियोजित रस्त्यांची एकूण लांबी ही ५.६५ किमी आहे.

iv. नियोजित रस्त्यांपैकी १.५६ किमी लांबीचे रस्ते हे 'चांगल्या' दर्जाचे, ८.५८ किमी लांबीचे रस्ते हे 'मध्यम' दर्जाचे, ९.९३ किमी लांबीचे रस्ते हे 'खराब' दर्जाचे, ०.५९ किमी लांबीचे रस्ते हे 'अति खराब' दर्जाचे, ३.५५ किमी लांबीचे रस्ते हे 'कच्चे' रस्ते या स्वरूपाचे आहेत.

v. अनियोजित रस्त्यांपैकी २.०२ किमी लांबीचे रस्ते हे 'खराब' दर्जाचे, २.५६ किमी लांबीचे रस्ते हे 'कच्चे' रस्ते व १.७ किमी लांबीची पायवाट आहे.

vi. इसवली अंतर्गत असणाऱ्या पनोरे या महसूल गावातील जुलूमवाडीपर्यंत जाण्याकरिता इसवली ग्रामपंचायत हद्दीतून प्रत्यक्ष रस्ता नाही.

vii. जुलूमवाडीत जाण्याकरिता साटवली गावातून साधारण ५.२३ किमी अंतर जावे लागते.

viii. मिळालेल्या दुय्यम माहितीनुसार **ग्रा.मा.१३६** या नियोजित रस्त्याच्या एकूण २.७३ लांबीपैकी १.५५ किमी लांबीचा रस्ता हा ग्रामपंचायत हद्दीमध्ये सर्वेक्षणात कमी आढळला. या रस्त्यावर सन २०१९-२० मध्ये **रस्ता विशेष दुरुस्ती कार्यक्रम (गट ड)** या योजनेतून ०.४३ किमी. (चेनेज १.४०० ते १.८३०) मजबुतीकरण व डांबरीकरणाचे काम केले असून यासाठी १० लाख मंजूर रकमेतून ९.३२ लाख रुपये खर्च करण्यात आलेला आहे.

## १२. शिफारशी

नियोजित आणि अनियोजित, दोनही प्रकारच्या रस्त्यांच्या बाबतीत, रस्त्याची लांबी, रस्त्याच्या सलग्न असणारी सार्वजनिक ठिकाणे व मालमत्ता, अवलंबित लोकसंख्या आणि दर्जा श्रेणी यांच्या आधारावर इसवली ग्रामपंचायत हद्दीतील रस्ते विकास कामांच्या प्राधान्य क्रमाबाबत पुढील शिफारशी करण्यात येत आहेत. कोणत्या रस्त्याला प्रथम/द्वितीय/तृतीय प्राधान्य द्यावे, तो रस्ता कुठपासून कुठपर्यंत आहे, त्याची गावातील एकूण लांबी किती आणि तातडीने काम करणे आवश्यक आहे अशा भागाची लांबी किती हे पुढील तक्त्यात दर्शविले आहे. यावरून रस्ते विकास कामांचा प्राधान्यक्रम ठरवता येईल.

**तक्ता क्र. ६ नियोजित रस्त्यांच्या विकासकामांचा प्राधान्यक्रम**

| प्राधान्य क्रमांक | रस्ता क्र. | पासून | पर्यंत | गावातील रस्त्यांची एकूण लांबी | तातडीने काम आवश्यक असलेल्या भागाची एकूण लांबी (किमी) (दर्जा श्रेणी ४, ५ व ६) |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्र.जि.मा.६३ | रा.मा.१५० | जावडे गाव | ९.९६ | १.१ |
| | ग्रा.मा.११२ | सुतारवाडी प्राथमिक शाळा | प्र.जि.मा.६३ | ३.१२ | ०.१ |
| २ | ग्रा. मा १८७ | ग्रा.मा.११२ व ग्रा.मा.१३६ | पाथरवाडी, खांबेरेवाडी रस्ता | ०.८८ | ०.८ |
| | ग्रा.मा १८८ | प्र.जि.मा.६३ | सुतारवाडी | ०.४१ | |
| ३ | ग्रा. मा. १६४ | प्र.जि.मा.६३ | गुरववाडी रस्ता | २.५४ | १.८४ |

**तक्ता क्र. ७ अनियोजित रस्त्यांच्या विकासकामांचा प्राधान्यक्रम**

| प्राधान्य क्रमांक | पासून | पर्यंत | गावातील रस्त्यांची एकूण लांबी (किमी) | तातडीने काम आवश्यक असलेल्या भागाची एकूण लांबी (किमी) (दर्जा श्रेणी ४, ५ व ६) |
|---|---|---|---|---|
| १ | ग्रा.मा.११२ | सुतारवाडी | ०.३ | ०.३ |
| २ | रा.मा.१५० | जुलूमवाडी | १.०७ | १.०७ |
| | गुरववाडी | खांबेरेवाडी | ०.८ | ०.८ |
| | प्र.जि.मा.६३ | बौद्धवाडी | ०.२ | ०.२ |
| | प्र.जि.मा.६३ | नरसलेवाडी स्मशानभूमी | ०.५ | ०.५ |
| ३ | रा.मा.१५० | जुलूमवाडी | ०.५ | ०.५ |
| | प्र.जि.मा.६३ | कवचेवाडी | ०.३ | ०.३ |
| | प्र.जि.मा.६३ | रेवटेवाडी | ०.३ | ०.३ |
| | प्र.जि.मा.६३ | मोर्येवाडी | ०.१ | ०.१ |
| | प्र.जि.मा.६३ | सुर्वेवाडी | ०.०८ | ०.०८ |
| | प्र.जि.मा.६३ (पनोरे रेशन दुकान) | कातळशिल्प | ०.४ | ०.४ |
| | प्र.जि.मा.६३ | कातळशिल्प | १.७ | - |

## संलग्नक

i. **संकलित माहिती**
[https://drive.google.com/drive/folders/1ZlVelsmkZKHR4mt4IwCvskiiLe1JajxD?usp=drive_link](https://drive.google.com/drive/folders/1ZlVelsmkZKHR4mt4IwCvskiiLe1JajxD?usp=drive_link)

## ii. छायाचित्रे



Latitude: 16.814563
Longitude: 73.44561
Elevation: 121.82±19 m
Accuracy: 6.5 m
Time: 04-12-2023 16:30
Note: Isavali
Powered by NoteCam






Time: 05-12-2023 11:20
Note: Panore
Powered by NoteCam






## संदर्भ


i. जनगणना तक्ते -
[Census tables | Government of India (censusindia.gov.in)](https://censusindia.gov.in)

ii. IRC SP20-2002 -
IRC SP 020: Rural Roads Manual : Indian Roads Congress : Free Download, Borrow, and Streaming : Internet Archive

iii. eGramSwaraj -
https://egramswaraj.gov.in/

iv. GPDP मार्गदर्शक तत्त्वे -
https://panchayat.gov.in/documents/20126/0/Revise+final+GPDP+Guildeline+maharashtra.pdf/42649552-d63c-b10b-14bb-c8c35b36042b?t=1554713527724

v. प्रधानमंत्री ग्राम सडक योजना -
https://rdd.maharashtra.gov.in/pradhan_mantri-gram-sadak-yojnass

vi. मुख्यमंत्री ग्राम सडक योजना -
https://rdd.maharashtra.gov.in/cm-gram-sadak-yojana

vii. रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालय -
https://morth.nic.in/state-public-works-department-pwd


## आभार


i. श्रीम. आकांशा नरसले, सरपंच, ग्रा. पं. इसवली

ii. श्रीम.पूनम कुंभार, ग्रामसेवक, ग्रा. पं इसवली

iii. श्री. विजय घोडेकर, उपसरपंच, ग्रा. पं इसवली

iv. सर्व ग्रा. पं. सदस्य, कर्मचारी व इसवली ग्रामस्थ